स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र



# सर्टिफिकेट कोर्स इन फुले-आंबेडर स्टडीज्

## अभ्यास केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २०१० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली. समताधिष्ठित, शोषणमुक्त, बंधुता व भगिनीभावावर आधारलेला धर्मनिरपेक्ष असा लोकशाही समाज निर्माण करणे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनध्येय होते. अशा समाजाच्या उभारणीसाठी आवश्यक अशा ज्ञानमीमांसेची कास धरावी, या हेतूने या केंद्राची स्थपना करण्यात आलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी ज्ञानाच्या क्षेत्रात नवी आव्हाने पेलली. शिक्षण हे समाजप्रबोधनाचे साधन व्हावे, या भूमिकेला अनुलक्षून हे अभ्यास केंद्र ज्ञानाच्या क्षेत्रात हस्तक्षेप करण्याची आणि समाजोपयोगी व मुक्तीदायी ज्ञानाची कास धरण्याची भूमिका घेते. जातिव्यवस्थेविरोधात चळवळ उभी करताना म. फुले व डॉ. आंबेडकरांनी नव्या ज्ञानाचे सृजन केले. नव्या समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी नव्या ज्ञानाचे सृजन करावे लागेल, या भूमिकेतून त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, शिक्षणशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी विद्याशाखांमध्ये पुनर्मांडणीची भूमिका घेतली. ज्ञाननिर्मितीची प्रकिया त्यांनी व्यस्त जीवनातही अव्याहतपणे सुरु ठेवली. त्यांनी निर्मिलेले ग्रंथभांडार आणि विकसित केलेली ज्ञानमीमांसा व अभ्यासपद्धती ही गेल्या अनेक दशकांमधील सामाजिक-सांस्कृतिक चळवळींचे प्रेरणास्त्रोत राहिलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात गरिबी, जातीयता, स्त्री-पुरुष विषमता, धर्मांधता असे अनेक प्रश्न उत्तरोत्तर तीव्र रूप धारण करीत असलेले आहेत. नैसर्गिक साधनसामग्रीचे विषम वाटप, प्रचलित विकास नीति व तद्जन्य विषमता याची नोंद अनेक अभ्यासक व आयोगांनी घेतलेली आहे. जागतिकीकरणाच्या युगात जातीची वीण सैल होईल, अशी अपेक्षा होती. या काळात जातिव्यवस्थेत कोणते बदल झाले, हे अभ्यासणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे समाजहितैषि अभ्यासप्रकल्प हाती घेणे, हे या केंद्राचे उद्दिष्ट आहे.